महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर
जुने सचिवालय इमारत, सिव्हील लाईन्स, नागपूर-440 001
ई मेल dycommgadngp@gmail.com
दूरध्वनी क्र.0712-2562568

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्र.सा.प्र./कार्या-4(3)/सं.क्र.-11/22/कावि- 549/2022

दिनांक :- 01 ऑक्टोबर, 2022

प्रति,

**मा. अपर मुख्य सचिव तथा**
**मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य,**
**सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा रोड,**
**हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई 400 032**

**विषय : 1 नोव्हेंबर, 2022 या अहर्ता दिनांकावर आधारीत शिक्षक मतदार संघाच्या मतदार याद्यांचा कार्यक्रम.**

**संदर्भ :** उपसचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.ईएलआर-2022/प्र.क्र.543/22/33 दिनांक 30.09.2022

महोदय

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मा. भारत निवडणूक आयोगाचे दिनांक 14.07.2022 चे पत्रानुसार, नागपूर विभागातील शिक्षक मतदार संघासाठी निवडणूक कार्यक्रम घोषित केलेला आहे. सदर कार्यक्रमाच्या वेळापत्रानुसार मतदार नोंदणी अधिनियम, 1960 च्या नियम 31(3) अन्वये दिनांक 01 ऑक्टोबर, 2022 रोजी जाहीर सूचना (Public Notice) मराठी व इंग्रजी माध्यमामध्ये दैनिक वृत्तपत्र-लोकमत (मराठी) व दैनिक वृत्तपत्र- हितवाद (इंग्रजी) या दोन वृत्तपत्रात प्रकाशित करण्यात आलेली आहे.

या कार्यालयाचे पत्र दिनांक 30.09.2022 अन्वये जाहीर सूचना (मराठी व इंग्रजी) जिल्हास्तरावर, उपविभाग स्तरावर, तहसिल स्तरावर तसेच अनुसूची-एक प्रमाणे पदनिर्देशित अधिकारी यांना नेमून दिलेल्या अधिकार क्षेत्रात प्रसिध्द करण्याबाबत जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले होते.

आज दिनांक 01.10.2022 रोजी नागपूर विभागातील सर्व जिल्हाधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, नागपूर विभागातील सर्व जिल्हास्तरावर, उपविभाग स्तरावर, तहसिल स्तरावर तसेच अनुसूची-एक प्रमाणे पदनिर्देशित अधिकारी यांना नेमून दिलेल्या अधिकार क्षेत्रात जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर जाहीर सूचना (Public Notice) मराठी व इंग्रजी माध्यमामध्ये प्रकाशित केलेल्या दैनिक वृत्तपत्र-लोकमत (मराठी) व दैनिक वृत्तपत्र- हितवाद (इंग्रजी) या दोन वर्तमानपत्राची प्रत यासोबत सादर करण्यात येत आहे.

आपली विश्वासू,

**(आशा पठाण)**
**उपायुक्त (सा.प्र.),**
**विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर**

सहपत्र :- वरीलप्रमाणे